## प्रकरण पहिले

## कादंबरी एक वाङ्मयप्रकार आणि " धग "

## पूर्व ग्रामीण कादंबरीची पूर्वपीठिका

## प्रास्ताविक

कादंबरी हा साहित्यप्रकार कथा, कविता किंवा नाटक यांच्यापेक्षा प्रकृतीने मूलत: वेगळा आहे, बदलतया मानवी जीवनाप्रमाणे कादंबरीनेही विविध रुपे धारण केली आहेत. कादंबरीची सर्वमान्य अशी वयाख्या करणे अजूनही शक्य झालेले नाही. अशी ही कादंबरी, तिची व्याख्या न करता येण्याचे कारण तिच्या प्रकृतीतच लपलेले आहे. त्यामध्येच तिचे स्वरुप आणि महत्ता दडलेली आहे. आज कादंबरी हा वाङ्.मयप्रकार सर्वात महत्वाचा आणि प्रमुख वाङ्.मयप्रकार म्हणून मान्यता पावलेला आहे.असे दिसते. या तिच्या लोकप्रिय तेची काही निश्चित कारणे आहेत. ती म्हणाजे तिने कविता, कथा, नाटक, चरित्र आत्मचरित्र , पत्र, निबंध, ऐतिहासिक दस्तऐवज या सर्व वाङ्.मयप्रकारांची एकात्मता साधली आहे. त्यातूनच तिने आपले स्थान निश्चित केले आहे. तिच्या समृध्द होत गेलेल्या प्रवाहाची चिकित्सा व या प्रवाहाचा आलेख या अनुषंगाने कादंबरीची संकल्पना स्पष्ट करावयाची आहे.

## कादंबरी एक वाङ्.मयप्रकार

कादंबरी हा वाङ्.मयप्रकार महाकाव्यासारखा आहे. महाकाव्याप्रमाणेच कादंबरीतही एखाद्या देशातील लोकसमुदायाचे विस्तृत स्वरुपाचे जीवन-चित्रण केलेले असते. त्याचे यश,

अपयश, त्यांची सुख-दु:खे, त्यांच्या रूढीपरंपरा, त्यांच्या आशा आकांक्षा, त्यांच्या धर्मसंस्कृतीच्या अनेक महत्वाच्या गोष्टी ज्याप्रमाणे महाकाव्यात प्रतिबिंबित होतात, तशा त्या कादंबरीतही प्रतिबिंबित होतात, असे हेन्री फिल्डींग याने म्हटले आहे. तो कादंबरीचे वर्णन " गद्य महाकाव्य" असे करतो.

कादंबरी हे नांव बाणभट्टाच्या " कादंबरी" या ग्रंथावरुन रुढ झालेले आहे. मराठी कादंबरी हा इंग्रजीतील " नॉव्हेल " साठी वापरला जाणारा प्रतिशब्द आहे. युरोपात कादंबरी १८ व्या शतकात उदयाला आली. चीन-मध्ये १५ व्या शतकात व इतरत्र ती कोठेही आढळत नाही. असे डायना स्पिअरमन आपल्या " नॉव्हेल ॲण्ड सोसायटी " या ग्रंथात म्हणतात" [१] इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेत मराठी कादंबरीचा इतिहास फार मोठा नाही. मराठीतील पहिली कादंबरी " यमुना पर्यटन" १८५७ मध्ये प्रसिध्द झाली.

कादंबरी हा साहित्यप्रकार म्हणून जरी आधुनिक असला तरी त्याचे बीज फार जुने आहे. समाजजीवनाशी व्यापक नाते जोडणारा असा हा वाङ्मयप्रकार आहे. या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप विस्तृत व सखोल आहे. कादबरी सदृश्य गद्य कथात्मक साहित्य महाराष्ट्रात ११ व्या शतकात

लीळा चरित्राच्या रुपाने निर्माण झाले आहे. या लीळा चरित्राच्या कथा छोटया छोटया असून म्हाइंभटांनी चक्रधरांची जीवनकथा सलग तीन विभागात वर्णन केलेली आहे. कादंबरी वाड्.मयप्रकाराची वैशिष्टये आपणास लीळा चरित्रामध्ये दिसतात.

कादंबरीत काही व्यक्तींच्याद्वारा लेखक जीवनाचे आपले निरीक्षण व आकलन प्रकट करीत असतो. कादंबरी म्हणजे संसारचित्र होय. कादबरी या वाड्.मयप्रकारात लेखकाची विशिष्ट जीवनदृष्टी व्यक्त होत असते. लेखकाच्या या जीवन-दृष्टीच्या सखोलपणावर संपन्न बनविण्यासाठी लेखकांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती , त्याचे जीवनाविषयीचे आकलन इत्यादी गोष्टी महत्वाच्या असतात. लेखकाच्या या जीवनदृष्टीच्या सखोलपणावर व व्यापकतेवरच त्यांच्या कादंब-या अवलंबून असतात.

## कादंबरीचे स्वरुप

मराठीमध्ये कादंबरीच्या स्वरुपाविषयी सर्वप्रथम विचार का. बा. मराठे यांनी मांडला आहे. ते म्हणतात " जसे नाटकात तसे नावलात काळ, वेळ व स्थळ ही एकत्र असले पाहिजे" [२] कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न आजवर अनेकांनी केला आहे. कादंबरीची व्याख्या न करता येण्याचे कारण तिच्या प्रकृतीतच दडलेले आहे असे उषा हस्तक यांनी म्हटले आहे ते उचितच आहे." [३]

विशाल अशा मानवी जीवनाचं चित्रण करणाऱ्या कादंबरीचे स्वरूप गुंतागुंतीचे असल्याने तिला व्याख्येत बांधणे कठीण आहे, त्यामुळे तिच्या व्याख्येत विविधता आली. रा. ग. जाधव यांची व्याख्या आपणास काही प्रमाणात समाधानकारक वाटते. जाधव लिहितात, " कथानक , व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टीकोण व यांना अनुरूप अशी निवेदनतंत्रे, वर्णने, वातावरण निर्मिती, शैली इ.घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तवजीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय"[४]

कादंबरी हा लेखकाच्या मनाने काही घटना व पात्रांच्या सहाय्याने जीवनाचा व मानवी मनाचा घेतलेला एक शोध ठरतो. कादंबरी हे तिच्या निर्मात्याला जीवनाचे भावलेले एक रूप असते. या संदर्भात कुसुमावती देशपांडे लिहितात, " पार्थिव संसाराविषयीची आस्था ही कादंबरीची वृत्ती, जीवनाचे कानेकोपरे चौकसपणे धुंडाळणे, तत्वदर्शित्वाचा किंवा अद्भूताचा मार्ग धरून मूलत: मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टीकोण, जीवनविषयक अनुभव वा कल्पना या कादंबरीचा मूळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री ही वृत्ती, हा दृष्टिकोण, हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या व एका विस्तृत आकर्षक कथानकाच्याद्वारे व्यक्त करणेही कादंबरीची पध्दती"[५] कादंबरीत व्यक्ती आणि व्यक्तिसंबध्द घटनांनी युक्त अशा कथात्मकतेस रूप लाभते

हे खरे परंतू व्यक्ती केवळ व्यक्ती म्हणून स्वतंत्र नसते तर ती भोवतालच्या समाजजीवनाचा एक घटक असते. कादंबरी ही विशिष्ट व्यक्तींच्या संदर्भात आणि विशिष्ट कालावधीत घडलेली एक भाषिक घटना असते.

जे. बी. प्रिस्टले यांनी " काल्पनिक पात्रे व घटना यांचा परामर्श घेणारा गद्य कथाप्रकार"[६] अशी व्याख्या केलेली आहे. या व्याख्येत कादंबरीच्या कथात्मकता आणि निवेदनात्मकता या घटकांबरोबरच पात्रे व घटना या महत्वाच्या घटकांचाही निर्देश आला आहे. डेविड सिसिल यांनी " जीवन जगताचा परिचय करुन देणारी कला"[७] अशी कादंबरीची व्याख्या केलेली आहे. हेन्री जेम्स म्हणतो, " कादंबरी म्हणजे वैयक्तिक जीवनानुभुती होय"[८] तर प्रेमचंद म्हणतात, " मै उपन्यास को मानव चरित्र का चित्र मात्र समझता हूँ। मानव चरित्र पर प्रकाश डालना और उनके रहस्यों को खोलना ही उपन्यासो का मूल तत्व है।[९]

एकंदर कादंबरीच्या व्याख्यांचे स्वरुप अपूर्ण असलेले दिसते. कोणतीही व्याख्या कादंबरीची स्वरुपता व्याख्येमध्ये बंदिस्त करु शकलेली नाही. कादंबरीची व्याख्या करता येऊ नये यामध्ये विद्वांनाचा पराभव असला तरी कादंबरीस मात्र ते भूषणावह आहे. कारण तिच्या या गुणातच तिचे स्वरुप दडलेले आहे.

एखादी गोष्ट जेंव्हा व्याख्येमध्ये बंदिस्त होते तेंव्हा ती विकासाच्या संदर्भात स्थितीशील असते. तरीही कादंबरीची सर्व समावेशक आणि नेमकी अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न भालचंद्र नेमाडे यांनी केला आहे, त्यांच्यामते, " कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत, अशी साहित्यकृती असते. कादंबरीच्या सर्व गोष्टीमुळे एखादी मोठी कृती साकल्याने मांडता येते. सामाजिक आशय विशाल असावा लागतो. एखाद्या पोटसमुहाचे, पोट संस्कृतीचे तपशीलासह दर्शन घडविलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात, पात्रे सलग उभी असतात"[१०] नेमाडे यांच्या या व्याख्येमध्ये कादंबरीच्या अनेकविध वैशिष्टयांचा समावेश आहे. ही व्याख्या समर्पक व सार्थ आहे. कारण कादंबरीत खंडिततेपेक्षा प्रसंगाच्यापरिपूर्ण चित्रणाची आवश्यकता अधिक असते.

मानवाचे नानाविध व्यवहार, त्यांची विविध नाती, त्यांचे परस्पर संबंध त्यांच्या इच्छा, आशा, आकांक्षा, सर्व प्रकारच्या भाव-भावना व असंख्य मनोव्यापार त्यांच्याकडून घडणाऱ्या कृति-प्रतिकृती तात्पर्य मानवाच अंतर्बाह्यवैयक्तिक आणि सामाजिक जीवन ही कादंबरीची सामुग्री आहे. या अफाट मानवी जीवनाचे मंथन करुन त्याच्या तळाशी असलेली सत्ये शोधून काढण्याचे कार्य

कादंबरीकार करीत असतो. हे विशाल असे मानवी जीवन ही कादंबरीची सामुग्री आहे, असे श्री. मा. कुलकर्णी आपल्या " कादंबरीची रचना" या ग्रंथात म्हणतात, " या पार्श्वभूमी-वरच बापट, गोडबोले, एच. बी. वेल्सच्या व्याख्येचा आधार घेवून असे मत व्यक्त करतात की, " कादंबरी वाङ्.मयाचा पसारा पाहिल्यावर या सर्वांस एका सूत्रात आणून ठेवणारी व्याख्या बनविण्याचा प्रयत्न जिज्ञासू वाचकाने मन गोंधळात पडून एच.जी. वेल्सने कादंबरीस " गारुड्याची थैली" म्हणून दिलेली विनोदी संज्ञाच तिची उत्कृष्ठ व्याख्या वाटल्यास नवल नाही". ११ कादंबरीच्या व्याख्यानिर्मिती मधील अडचणी सांगतांना उषा हस्तक म्हणतात, " कादंबरीमध्ये केवळ तिच्याच घडणीच्या संदर्भात दृग्गोचार होणारे एकही वैशिष्टय दाखविता येत नाही. तिची वैशिष्टये अन्य वाङ्.मयप्रकारात आढळतात. " गंगाधर गाडगीळ यांनी म्हटले आहे की, असे म्हणता येईल की, कादंबरीची रचना संघराज्याच्या घटनेसारखी असते. कादंबरीत अनेक केन्द्रे असतात. स्वतंत्रपणे विकास पावणारी ,अनेक कथाबीजे असतात, वेगवेगळ्या घटकांतून रचलेल्या अनुभवांच्या अनेक स्वायत्त संघटना रचलेल्या अनुभवांच्या अनेक स्वायत्त संघटना असतात. पुष्कळदा तिच्यातील भिन्न कथासूत्रे परस्परांच्या प्रगतीला मदत करतात, मात्र असे नेहमीच असते असे नाही. कधी कधी या भिन्न कथासूत्रातील पात्रांचा आणि त्यांच्या कृतींचा व्यावहारिक संबंध अत्यल्प असतो, गौण असतो अगर मुळीच नसतो पण ते

ते कांही असले तरी कोणत्याही कादंबरीतील या स्वायत्त अनुभव संघटनांचा परस्परांशी कलात्मक संबंध मात्र निश्चित असतो" [१३]

कादंबरी हे आपल्या काळाचे चित्र असते असे मानल्यानंतर तिच्यात सामाजिक जीवन आशयरूपाने येणे अपरिहार्य ठरते. सामाजिक वास्तव हेच कादंबरीचे आशयद्रव्य असते. सामाजिक वास्तव आणि व्यक्तिगत वास्तव असा भेद करणेही शक्य नाही. कारण व्यक्ती सामाजिक वास्तवात जगत असते. व्यक्तीव्यक्तीचे परस्परांशी जे संबंध येतात त्यातच सामाजिकता असते. कारण व्यक्ती ही व्यक्ती म्हणून वेगळी नसून ती सामाजिक वास्तवाचा भाग असते. सामाजिकतेशिवाय व्यक्तीच्या जीवनाला अर्थपूर्णता लाभत नसते. म्हणून कादंबरीत व्यक्ती-कुटुंब-समाज असे संबंध रेखाटले जातात. कादंबरीत काही विशिष्ट व्यक्तींचे जीवन चित्रण होत असले तरी शेवटी त्यातून मानवी स्वभावच चित्रित झालेले असतात. अशारीतीने तो मानवी मनाचा शोध ठरतो. कथानक, व्यक्तिरेखन, संघर्ष, वातावरण निर्मिती, भाषाशैली, मनोविश्लेषण इ. कादंबरीचे घटक मानले जातात. हे घटक कमी अधिक प्रमाणात पण निश्चितपणे पहावयास मिळतात. घटक निश्चित असले तरी स्वरूपमात्र निश्चित असतेच असे नाही. व्यक्तिगत आणि सामाजिक वास्तव ही कादंबरीची भूमिका असून तिचा प्रवास विशिष्टाकडून सामान्याकडे असा असतो. आजू-बाजूच्या जीवनातूनच काही घटक वेचून कादंबरी आकार घेते. जीवनचित्रण ऐवढच केवळ उद्दिष्ट न ठेवता आत्म-

शोध आणि जीवनशोध या प्रेरणा तिच्या ठायी सबळ असतात. म्हणूनच कादंबरी समाजजीवनाचे चित्र ठरते. तसेच कादंबरीत चित्रित झालेल्या व्यक्तींचे भावानुभव मानव-जातीस मानवतेच्या पातळीवरुन समाने आहेत म्हणून कादंबरीतील व्यक्ति विशिष्ट अनुभव विश्वात्म पातळीवर जातात. यामुळेच कादंबरी हा वाङ्.मयप्रकार आज सर्वश्रेष्ठ वाङ्.मयप्रकार असेलेला दिसून येतो.

अशा प्रकारे कादंबरीच्या विविध व्याख्यांच्या आधारे आपण कादंबरीची स्वरुपवैशिष्टये लक्षात घेतली. त्यावरुन कादंबरी हा वास्तवाधिष्ठित साहित्य प्रकार आहे हे आपल्या लक्षात आले. जीवनसत्यांचा कादंबरीकाराला जो एक भावनिक प्रत्येय आलेला असतो त्याचाच कादंबरी हा एक अविष्कार असतो.

## मराठी कादंबरीची वाटचाल :-

अव्वल इंग्रजीतील कथा वाङ्.मय प्रकाशातूनच कादंबरीचा विकास झाला असे आपल्याला दिसते. लघुकथा आणि कादंबरी हे वाङ्.मयप्रकार मराठीने इंग्रजीपासून घेतलेले आहेत. मराठीत १८५७ ते १८८५ या काळात हा वाङ्.मयप्रकार उदयास आला मराठी कादंबरी वाङ्.मयाचा प्रारंभ म्हणजे पाश्चात्य साहि-त्याचा परिणाम होय, असे असले तरी एक वाङ्.मयप्रकार म्हणून कादंबरी हा वाङ्.मयप्रकार पाश्चात्य असला तरी कादंबरीहा शब्द अस्सल भारतीय आहे. बाबा पद्मनजी यांनी लिहिलेल्या " यमुना पर्यटन " ( १८५७ ) ही मराठीतील पहिली कादंबरी

होय. त्यानंतर १८७१ मध्ये रा. भि. गुंजीकरांची " मोचनगड " ही ऐतिहासिक कादंबरी प्रसिध्द झाली. मराठी कादंबरीचे पहिले मानकरी म्हणून या लेखकांचा उल्लेख करावा लागेल. सुरवातीच्या या कादंब-यांना कलात्मकतेच्या दृष्टीने काही मर्यादा आहेत. परंतु पुढे या वाङ्‌मयप्रकाराला स्वतंत्र, आकर्षक व सुसंघटित स्वरुप प्राप्त होत गेले.

१८८५ पासून हरिभाऊंची प्रतिभा कार्यरत होऊ लागल्या-पासून मराठी कादंबरीची प्राथमिक अवस्था संपुष्ठात येऊन तिचे प्रौढ आणि प्रभावी स्वरुप प्रकट होत गेले. मराठी कादंबरीला अद्भूत वातावरणांतून बाहेर काढून तिचा वास्तव-सृष्टींत सन्मानपूर्वक प्रवेश करविणारे आणि तिची उद्‌बोधन विषयक आणि कलात्मक प्रतिष्ठा फार मोठया प्रमाणावर वाढविणारे हरि नारायण आपटे यांची पहिली कादंबरी " मधली स्थिती " यामध्ये पुण्यातील समाजजीवन रंगविताना त्यांनी पंढरपेशा समाजाची आचार-विचार या दृष्टीने झालेली पडझड स्पष्ट केली आहे. पुण्यातील ब्राम्हण कुटुंबाचे चित्रण त्यांच्या " गणपतराव " या दुस-या कादंबरीत आले आहे. त्यातील स्त्रियांच्या कपाळी लिहिलेल्या दु:खाची कहाणी त्यांनी सांगितलेली आहे. स्त्री-पुरषांच्या सुख दु:खाच्या कहाणीबरोबर सामाजिक सुधारणेचे ध्येय हा विषय

हरिभाऊंच्या " पण लक्षात कोण घेतो " या कादंबरीत चित्रित झाला आहे. स्त्री सुधारणावादाची दिशा देऊन परिवर्तनाची आवश्यकता सूचित केली आहे.

वामन मल्हार जोशी ( जन्म १८८२ - मृत्यू-१९४३) आणि श्रीधर व्यंकटेश केतकर हे दोघे मराठी कादंबरीचा दुसऱ्या टप्प्यातील मानकरी आहेत. त्यांच्या सामाजिक प्रश्नांच्या चित्रणात, तत्वचर्चात्मक लेखणीने मराठी कांब कादंबरीच्या वाटचालीचा दुसरा महत्वाचा टप्पा व्यापून गेलेला आढळतो. वामन मल्हार जोशी यांच्या " रागिणी" या कादंबरीत देशप्रेम, धर्मप्रेम, स्त्री स्वातंत्र्य, विधवाविवाह शारीरिक प्रेम, आणि आत्मिक प्रेम इत्यादी जिव्हाळयाच्या विषयावर चर्चा झ आली आहे. त्याचा " आश्रमहरिणी " " सुशीलेचा देव " इंदू काळे सरला भोळे, या कादंबऱ्यातून अनुभव येतो. सर्वांगीण जीवनविकासाच्या दृष्टीने सत्य, सौजन्य, आणि सौंदर्य या तिन्ही तत्वांचा आवश्यक असलेल्या समुचित सहकार्याचा त्यांनी वेळोवेळी पुरस्कार केला आहे. मात्र त्यांना सौंदर्यदृष्टीने पाहिजे तितका चोखंदळपणा दाखविलेला नाही असे सहज दिसून येण्यासारखे आहे. स्त्री जीवनाची दुःखे वामन मल्हारांना जाणवली आणि ती चितारण्याचे कार्य वैचारिक पातळीवरत्यानी केले आहे. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या कादंबऱ्याचे स्वरुपही वैचारिक आहे. पुनर्विवाह, विधवा-विवाह यासारख्या सामाजिक प्रश्नाचे चित्रण केले आहे. केतकरांच्या कादंबऱ्यांच्या रुपाने मराठी कादंबरीने प्रगतीचा एक नवा व पुढचा टप्पा गाठलेला आहे.

कोणत्याही समाजाला रंजनाची गरज असतेच, कलात्मक रंजनाकडे खेचला जाणारा वर्ग एकूण वाचक वर्गाच्या संख्येत नेहमी अधिक असतो. स्वप्नपूर्तीचे समाधान देणारी मनोरंजनात्मक कादंबरी ना. सी. फडके यांनी लिहिली. " अल्ला हो अकबर" " जादुगार" " कांचनमृग " " दौलत" अशा अनेक कादंब-या त्यांनी लिहिल्या. " दोन ध्रुव", " दोन मने " " पांढरे ढग " " अमृतवेल " इ. कादंब-यातून खांडेकरांनी वाचकांच्या मनावर ध्येयवाद, आदर्शवाद, यांचे संस्कार घडविण्याचा प्रयत्न केला. माडखोलकर यांनी " नाग-कन्या" " भंगलेले देऊळ " " मुक्तात्मा" " नवे संसार " याकादंब-या लिहिल्या.

मानवी स्वभावांतील विकृतींचे चित्रण करण्यांत माडखोल-करांच्या लेखणीने बराच उत्साह दाखविलेला आहे. विवाहीत स्त्रीच्या जीवनांत पतीच्या पत्नीद्रोहामुळे उत्पन्न होणारे सामाजिक प्रश्न त्यांनी आपल्या काही कादंब-यातून चितारले आहेत. राजकीय पार्श्वभूमी हा त्यांच्या " मुक्तात्मा" या कादंबरीचा गाभा आहे.

कथानकप्रधान आणि व्यक्तिदर्शन प्रधान असे जर कादंब--याचे वर्गीकरण केले तर १९२० ते १९५० या कालखंडातल्या कादंब-यांबाबत असे स्थूलमानाने दिसून येते की, पहिल्या प्रकारची निर्मिती पुष्कळच मंदावलेली आहे आणि दुसरा प्रकारमात्र भरभराटीस आलेला आहे. बेडेकर, मर्ढेकर व वसंत कानेटकर

यांनी वापरलेल्या संज्ञा-प्रवाहपध्दतीमुळे तर चित्रण विषय बनविलेल्या व्यक्तींच्या मानसकोषांतील सूक्ष्मातीसूक्ष्म आंदोलनाचे दर्शन घडविणे आज शक्य झाले आहे. स्वप्नरंजन ध्येयवाद, यानंतर मराठी कादंबरी वाङ्.मयाने वास्तवतेच्या दिशेने वाटचाल केली आहे. स्त्रीयांचे ज्वलंत प्रश्न, त्यांचे सुख-दु:ख यांच्या जवळपास जाणा-या स्त्री कादंबरीकारांची एक पिढी निर्माण झाली आहे.

विभावरी शिरुरकर यांनी " हिंदोळयावर " या कादंबरीतून स्त्रियांचे दु:ख, यातना, कष्ट, भावना या सा-याचे उत्कटपणे चित्रण केले आहे. " रात्रीचा दिवस " ही मर्ढेकरांची कादंबरी माणसांच्या सुप्त मनाचे चित्रण करते. विश्राम बेडेकर यांची " रणांगण" ही वास्तवतेच्या अधिक जवळ जाणारी कादंबरी आहे. रघुवीर सामंताच्या " उपकारी माणसे " या कादंबरीचे मराठी कादंबरीच्या इतिहासात स्वतंत्र आणि वैशिष्टपूर्ण स्थान आहे, १९४७ ते १९५० मधील " एल्गार" " क्रौ " या महत्वपूर्ण साहित्यकृती आहेत. नुसते सुखदु:खे नव्हे तर ती सुख दु:ख ज्या समाजजीवनामुळे साकार झाली ते समाजजीवन जाणून घेण्याविषयी मराठी कादंबरी आता उत्सुक झालेली आढळते. आता आपण ग्रामीण कादंबरी आणि प्रादेशिक कादंबरी मधील भेद अभ्यासू.

## " धग " पूर्व ग्रामीण कादंबरीची पूर्वपीठिका

मराठी साहित्य १९३० पर्यंत शहरी, मध्यमवर्गीय कक्षेतच अडकले होते, त्यातच फडके, खांडेकर यांनी या काळात कादंबरी रचनेचे काही संकेत रूढ करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. शहरातील, मध्यमवर्गीयांचे मनोरंजन व स्वप्नरंजन प्रमाण मानून त्यांनी आपले कादंबरी लेखन केले. अशा या आकाळात ना. वि. कुलकर्णी, वि. स. सुखटणकर यांनी ग्रामीण आणि प्रादेशिक चित्रणाचा जाणीपूर्वक प्रयत्न केला. या काळात परिचित झालेल्या ग्रामवादाविषयक विचारांमुळे लेखक ग्रामीण जीवनाकडे सहानुभूती-पूर्वक पाहू लागले. ही सहानुभूती ग्रामवाद आणि ग्रामीण साहित्याच्या समृध्दीस पूरक ठरली.

या साहित्याची मुख्यप्रेरणा वास्तवचित्रणाची होती. तसेच या लेखकांजवळ शहरी जीवनातील साचेबंद अनुभव विश्वाऐवजी नवे अनुभव विश्व शोधण्याचा आणि आविष्कृत करण्याचा आत्म-विश्वास होता. र. वा. दिघे यांनी आपल्या कादंबरीत आपण शहरी पध्दतीचे जीवन चित्रण करणार नासून मराठमोठा, रांगडा, ग्रामीण प्रणय दाखविणार आहोत असे आश्वासन वाचकांना दिले आहे" [१४] तसेच आपण वास्तवजीवनाचे चित्रण करीत आहोत असा आत्मविश्वास त्यांनी इतरत्र व्यक्त केला आहे" [१५] अशा प्रकारे प्रादेशिक साहित्याचा जन्म मुळात वास्तववादी प्रवृत्तीतून झाला आहे. वास्तवचित्रण ही प्रादेशिक साहित्याची प्रवृत्ती आहे.

## ग्रामीणता आणि प्रादेशिकता : संकल्पना

मराठी ग्रामीण कादंबरीचा विचार करतांना " ग्रामीणता" आणि " प्रादेशिकता" या संकल्पनांचा विचार क्रमप्राप्तच ठरतो. प्रादेशिक साहित्य हे ग्रामीण साहित्यापेक्षा व्यापक आणि विस्तृत आहे. प्रादेशिक साहित्यामध्ये ग्रामीण साहित्यही अपेक्षित आहे. म्हणून ग्रामीण साहित्य अशी वेगळी संकल्पना न मानता प्रादेशिक साहित्य ही एकच संकल्पना मानावी असे काही समीक्षकांचे मत आहे तर प्रादेशिक साहित्य आणि ग्रामीण साहित्य या दोन्हीही प्रवाहात ग्रामीणता हा समान घटक आहे त्यामुळे प्रादेशिक साहित्य अशी संकल्पना न मानता ग्रामीणसाहित्य असा एकच शब्द वापरावा आणि एवढा एकच प्रकार मानावा असे कांही समीक्षकांचे मत आहे. एकूण ग्रामीणता आणि प्रादेशिकता या संकल्पना बद्दल परस्पर भिन्न मते प्रसृत आहेत.

या संकल्पनांना मराठी समीक्षेत अजून पुरेशी स्पष्टता लाभलेली नाही. प्रादेशिक ही संज्ञा पहिल्यांदा वापरली गेली त्यावेळी त्या संज्ञेच्या वापरात सहेतुकता होती. वि. स. सुखठणकरांनी " सह्याद्रीच्या पायथ्याशी" या कथासंग्रहावर आठ प्रदेशिक कथा" असे शीर्षक छापले ते त्यात गोमंतकाचे जीवन चित्रण होते म्हणूनच. तत्कालीन मध्यमवर्गीय लेखकांनी लिहिलेल्या व्याज ग्रामीण कादंबऱ्यापासून या कादंबऱ्यांचे वेगळेपण दाखविण्यासाठी हा शब्द समर्थपणे वापरला गेला. र. वा. दिघे यांनी मात्र त्यांना प्रादेशिक कादंबरीकार म्हणतो. त्यांनी उलट" ग्रामीण" हा शब्द वापरला आहे.

माडगुळकरांच्या " बनगरवाडी " मुळे " प्रादेशिक " हा शब्द पुन्हा पुढे आला.

ग्रामीण साहित्याचे पुरस्कर्ते साहित्यिक आणि समीक्षक आनंद यादव म्हणतात, " ग्रामीण हा शब्द त्या प्रदेशातील शहरी वाड्.मयाला आपोआप व्याघात करणारा आहे म्हणून " प्रादेशिक वाड्.मय " असे न म्हणता या सर्वांना मिळून ग्रामीण वाड.मय असाच शब्द प्रयोग करणे जास्त योग्य वाटते "[१६] पुढे ते म्हणतात, " प्रादेशिक" हा शब्द वापरतांना त्या त्या प्रदेशातील " ग्रामीण" स्वरूपाचे लोकजीवन असा अर्थ अभिप्रेत असतो. त्यामुळे शेवटी प्रादेशिक कादंबरी ही ग्रामीण कादंबरीच मानावी लागते. "[१७] कोणतेही साहित्य विशिष्ट प्रदेशात घडत असते. यादवांच्या या मतानुसार त्यामुळे प्रादेशिक साहित्याचे वेगळेपण जाणवत नाही म्हणून " प्रादेशिक साहित्य" हा शब्द गळून ग्रामीण साहित्य असा शब्द वापरावा आणि शेवटी प्रादेशिक साहित्यात ग्रामीण जीवनाचेच चित्रण असते, या विधानाची पुष्टीही ते आपल्या मताला देतात पण काही अभ्यासकांचे असे मत आहे की आनंद यादवांनी " प्रादेशिक साहित्याला" शिंगे मोडून असे ग्रामीण साहित्य म्हणू नये. ग्रामीण साहित्यापेक्षा प्रादेशिक साहित्याची व्यापकता आणि विस्तृतता लक्षात घेवून " प्रादेशिक साहित्य" असा एकच शब्दप्रयोग करावा.

सर्वच कादंब-यामध्ये प्रदेश असतो, मग कांहीना प्रादेशिक म्हणावयाचे आणि काहींना प्रादेशिक म्हणावयाच नाही. असे का ? कारण कथानक जिथे घडते.त्या विशिष्ट प्रदेशाकडे द्यावे तितके लक्ष सर्वच कादंबरीकारांनी दिलेले नसते. खरे तर कांही कादंब-यातील विशिष्ट प्रदेश कादंबरीवर एक घटक अविभाज्य भाग म्हणून आलेला असतो. म्हणूनच सर्वच कादंब-यामध्ये कुठला ना कुठला प्रदेश असला तरी सर्वांनाच प्रादेशिक कादंबरी म्हणून संबोधता येणार नाही.

ना. सी. फडकेयांना प्रादेशिक साहित्याचे स्वतंत्रस्थान मान्य नाही. ते लिहितात, " ग्रामीण कथा या नावाचं औचित्य मी समजू शकतो. आणि मान्य करतो. परंतु प्रादेशिक कादंबरी असे नांव कादंबरीचा एक स्वतंत्र प्रकार म्हणून वापरलं जावं यात विचारांचा भोंगळपणा आहे अस मला वाटतं, कारण अस की खरं पाहिलं असता प्रत्येक कादंबरी प्रादेशिकच असते..तेव्हा " प्रादेशिक कादंबरी" वाटते तितकी नवीन मुळीच नाही अलीकडच्या लेखकांनी हा एक नवाच प्रवाह साहित्यात आणला हा दावा खरा नव्हे"[१८]

मधु कुलकर्णी यांच्या मते ग्रामीण-प्रादेशिक या दोन्हीही संज्ञा तशा समानधर्मीय आहेत फरक मानायचा झाल्यास व्याप्ती अव्याप्तीचा आहे. मधु कुलकर्णी कोणत्याही नांवाचा आग्रह धरत नाही, ते किंचितसा फरक मान्य करतात. ते लिहतात, " ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्य यामध्ये कांहीनी भेद मानलेला आढळतो. परिसर म्हणजे प्रदेश हे मान्य असल्यास ग्रामीण व प्रादेशिक या दोन्हीही संज्ञा तशा समानधर्मीय आहेत. हे मान्य होण्यास हरकत नाही. किंचितसा फरक मानायचाच

झाला तर " प्रादेशिक" ही संज्ञा " ग्रामीण" संज्ञेपेक्षा व्यापक आहे. असे फार तर म्हणता येईल"[१९]

नागनाथ कोत्तापल्ले यांना मात्र दोन्ही संज्ञा स्वतंत्र आहेत असे वाटते, काही बाबतीत साम्य आहे म्हणून त्यांसज्ञा एकच आहेत असे मानून त्या संज्ञेची वासलात लावणे त्यांनायोग्य वाटत नाही. ते म्हणतात, " प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला, ग्रामसंस्कृतीला फारसे महत्व देत नाही तर ते महत्व देते ते एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्पयाला. कधी ग्रामजीवन आलेच तर ते स्वतंत्रपणे येत नाही. ते येते ते त्या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा एक भाग म्हणून, येथे ग्रामसंस्कृतीपेक्षा त्या प्रदेशातील टापू अधिक महत्वाचा असतो. त्या दृष्टीने प्रादेशिक साहित्यातून व्यक्तिकेंद्रितता दिसत नाही, तर समूहकेंद्रितता हे या साहित्याचे वैशिष्टय असते"[२०]

थोडक्यात, प्रादेशिक आणि ग्रामीण या संज्ञामध्ये असलेला भेद दाखविण्याचा प्रयत्न काही समीक्षकांनी केलेला आहे असे दिसून येते. प्रादेशिक वैशिष्टयांमुळे प्रादेशिक कादंबरी ही इतर कादंब-यांहून वेगळी ठरत नाही, तीही शेवटी एक कादंबरीच आहे. वरील मतांनुसार " ग्रामीण साहित्य" आणि " प्रादेशिक साहित्य" संज्ञाबाबत एक वाक्यता दिसत नाही, सर्वच प्रश्नांची सांगोपांग फोड होत नाही. त्यामुळे हा प्रश्नही अनुत्तरीतच राहतो.

" धग " पूर्व ग्रामीण कादंबरीची पूर्वपीठिका

" धग " पूर्व ग्रामीण कादंबरीच्या पूर्वपिठिकेचा थोडक्यात काही महत्त्वाच्या कादंबरीकाराच्या आधारे विचार करु. येथे मराठी कादंबरीचा उगम कसा झाला आणि तिच्या विकासाच्या पाऊलखुणा कशा रुजल्या हे पाहावयाचे आहे.

हरिभाऊंच्या कालखंडात म. फुले यांच्या विचाराने प्रभावित होऊन लिहणारे कृष्णाराव भालेराव यांची " बळीबा पाटील " ही कादंबरी ग्रामीण जीवनावर लिहिलेली असल्याने ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. " बळीबा पाटील" ही " दीनबंधू " मध्ये प्रसिध्द झाली. इंग्रजांच्या आगमनापर्यन्तचा इतिहास तिच्यात रुपकात्म पध्दतीने केलेला आहे, त्यामुळे तीला कादंबरी म्हणता येईल की नाही याबद्दल शंका आहे. परिणामी मराठीतील पहिल्या ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात संभ्रम निर्माण होऊन ती जबाबदारी" धनुर्धारी" उर्फ रा. वि. टिकेकर यांनी १९०३ मध्ये लिहिलेल्या " पिराजी पाटील " या कादंबरीवर येवून पडते.

" पिराजी पाटील " ही धनुर्धारी ( रामचंद्र विनायक टिकेकर) यांनी १९०३ साली लिहिलेली पहिली मराठी ग्रामीण कादंबरी मानावी लागते. असे मत डॉ. यादव " ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव" या आपल्या ग्रंथात मांडतात.

भालेरांवाना कादंबरी हा प्रकार तसा नीटपणे हाताळता आला नाही. तसेच " ग्रामीणत्वा"चा प्रत्ययही एका मर्यादेपलीकडे ते देऊ शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर पहिली यशस्वी ग्रामीण कादंबरी म्हणून निर्देश करावा लागतो. तो धनुर्धारीच्या " पिराजी पाटील " या कादंबरीचाच.

महात्मा जोतीराव फुले यांच्या " शेतक-यांचा असूड " या पुस्तकाचा विचार आपण कादंबरीच्या उद्गमाविषयीच्या बाबत करण्याची वेगळी कारणे आहेत. विश्वकोशामध्ये या पुस्तकाविषयी माहिती सांगताना या पुस्तकाचा उल्लेख विस्तृत निबंध म्हणून केलेला आहे. परंतु या निबंधाची भाषा लालित्य-पूर्ण असल्यामुळे या पुस्तकाचा विचार ग्रामीण कादंबरीच्या अद्गमाच्या संदर्भात करण्यास हरकत नाही असे वाटते.

" शेतक-याचा आसूड " हा फुल्यांचा ग्रंथ शेतक-यांची दु:स्थिती वर्णन करण्यासाठी लिहिला आहे. ग्रंथाचे स्वरुप वैचारिक असले तरी त्यामध्ये लालित्य प्राप्त झालेले आहे. शेत-क-याची दु:स्थिती वर्णन करतांना जोतीबा फुले यांची लेखणी करुणारसाचा आविष्कार करते. त्यांच्या लेखनशैलीत एक आक्रमक-पणा आहे. तो वाचतांना आपण एखादी ग्रामीण कादंबरी वाचत आहोतकी काय असे वाटू लागते. त्याकाळच्या समाज-वास्तवाशी इमान राखून लेखन करणा-या महात्मा जोतीबा फुले यांना कादंबरी लिहावयाची नव्हती. परंतु त्यांच्या ठिकाणी असलेल्या जिव्हाळयामुळे आणि ख-या अवलोकन आकलनामुळे या लेखनात कादंबरीचे गुण उतरले आहेत.

स. गं. मालशे " शेतक-याचा असूड " संबंधी म्हणतात,
" शेतक-यांचा असूड" चा नावीन्य पूर्ण भाग म्हणजे शेतक-याच्या अवनत स्थितीचे वास्तव चित्र, त्या अवनन स्थितीची केलेली मूल-ग्राही चर्चा आणि तो स्थिती सुधारण्यास्तव सुचविलेली उपाय योजना हा होय. शेतक-याच्या वास्तव स्थितीचे चित्र रेखाटताना फुले यांनी त्याच्या हीनदीन गृहस्थितीचे जे वेधक वर्णन केले आहे ते एखाद्या ग्रामीण वास्तवादी कादंबरीला लाजवील इतके प्रत्ययकारी आहे" २१

फुले यांनी गावरान शैलीत मराठी वाङ्मयनिर्मितीची मुहूर्तमेढ रोवली हे ऐतिहासिक सत्य आहे. यानंतर कृष्णराव भालेराव यांच्या " बळीबा पाटील " या कादंबरीचा विचार करावा लागतो, ही कादंबरी एकूण चार भागात विभागलेली आहे, पहिल्या भागात खेडयातील जीवनाचे वर्णन आणि बळीबाच्या पाटीलकीचा इतिहास आला आहे, त्याचा व त्याच्याकुटुंबियांचा परिचय दुस-या भागात करुन दिलेला आहे. तिस-या भागात बळीबाने घेतलेल्या भाईबंदाच्या सभेचे वर्णन आहे. चौथ्या भागात बळीबाने जीवन सार्थकी लावण्यासंदर्भात काही उपदेशापर विवेचन केले आहे.

कादंबरीच्या प्रारंभी शेतकरी जीवनाचे आणि शेतीचे वर्णन येते. तत्कालीन ग्रामव्यवस्थेत शेतक-यांची अवस्था कशी बिकट होती हेच दिसून येते. तिस-या भागातल्या बळीबाने घेतलेल्या भाईबंदाच्या सभेचे वर्णन येते. या सभेत मानवाची वर्तणूक कशी असावी याबरोबरच खेडयातील रीतीरिवाज,

भांडणातंटे, याविषयीही चर्चा होते. बळीबा हा सर्वांना मायेने पोटाशी घेणारा, जातीभेद न मानणारा, निर्व्यसनी आदर्श असा माणूस आहे. धर्मव्यवस्थेत ब्राम्हणांचे वर्चस्व असल्यामुळे अस्पृश्य वर्गावर कसे अन्याय होतात याचे विवेचन आले आहे. या चर्चेवरील महात्मा फुले यांच्या विचारसरणीचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. म. फुले यांच्या सत्यधर्मास अनुसरुन केलेले विवेचन संवादरुप आहे.

" बळीबा पाटील " ही कादंबरी " दिनबंधू " मधून प्रसिध्द झाली. कृष्णाराव भालेराव हे त्या कलाकृतीचे लेखक होते. ही कादंबरी १८८८ मध्येच प्रसिध्द झाली असली तरीही १८८७ मध्येच लिहली गेली आहे, असे सीताराम रायकरांचे प्रतिपादन आहे. रायकरांच्या या विधानानुसार " बळीबा पाटील" ही पहिली ग्रामीण कादंबरी ठरते. " भालेराव: समग्र वाङ्.मय ( प्रकाशक : महात्मा फुले समता प्रतिष्ठान ) या ग्रंथात संपादक सीताराम रायकर यांनी या कादंबरीविषयी बरेच संशोधनात्मक विवेचन केले आहे. ही कादंबरी १८८८ मध्ये प्रसिध्द झाली असली तरी ती १८७७ मध्येच लिहली होती असे रायकरांचे मत आहे. त्यासाठी भालेरावांनी लिहलेल्या प्रस्तावनेचा आधार घेतला आहे. रायकरांनी या कादंबरीला प्रचारकी हेतू प्रधान मानून लिहिलेली कादंबरी ठरवून हे लेखन कादंबरी म्हणून झाले नसल्याची शक्यता वर्तवली आहे तसेच मजकुराचा ऐवज कादंबरी एवढा नसल्यामुळे " बळीबा पाटील " ही कादंबरी मानता येणार नाही असे म्हटले आहे.

तथापि फुले - भालेकरांच्या साहित्याचे मोल कोणत्याही परिस्थितीत अमान्य करतायेणार नाही.

विविध विषयावर होणारी लेखणी चालवणा-या धनुर्धारी उर्फ रा. वि. टिकेकरांनी " वाईकर भटजी " ( १८९८) आणि " पिराजी पाटील " ( १९०३) या कादंब-या लिहिल्या. दुष्काळामुळे वाताहात झालेल्या पिराजी पाटील यांची ही कहाणी आहे. पिराजी पाटील आपल्या कुटुंबाची व इतर शेतक-यांची करुण कहाणी सांगतो तीच कहाणी लेखक " धनुर्धारी " शब्दांत पुन:कथित करतात. शेतक-याकडे पाहाण्याची शहरी व पांढरपेशी लोकांची संकुचित व तुच्छता-वादीवृत्ती, सरकारी अधिका-यांची लाचखोरी, शेतक-यांची चीड इत्यादी अनेकबाबी या कादंबरीत येऊन जातात.

सारा गांव दुष्काळाचा आगीत होरपळून निघतो, तेंव्हा गांवचा पाटील पिराजी भुकेल्या लोकांच्या मुखात घास घालण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्याचे प्रयत्न अपुरे पडतात. दुष्काळ लंबाबतो. शेवटी लोक गांव सोडू लागतात, अन्नासाठी धर्मांतर करु लागतात. गावाची पार वाताहात होते. तरी पिराजी पाटील गावाचे पालक आहोत याच भावनेने वागतो. ग्रामीण साहित्य चळवळीशी संबंधीत अग्रस्थानी असणा-या डॉ. आनंद यादव यांनी आपल्या ग्रंथात " पिराजी पाटील " या कादंबरीच्या संदर्भात " पहिली मराठी ग्रामीण कादंबरी-" " पिराजी पाटील " हा लेख समाविष्ट केला आहे.

पिराजी पाटील ही ग्रामीण वास्तवाचा तलस्पर्शी वेध घेणारी वास्तवदर्शी कादंबरी आहे, एकंदरीत याकादंबरीला मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणण्यास कुठलाही प्रत्यवाय नाही. भाषा सरळ आणि रोखठोक आहे. रंजक साधनसामुग्रीचा आश्रय घेत नाही. लेखकाने कलात्मक सौंदर्य निर्मितीला आवश्यक असलेले परिष्करणाचे परिश्रम घेतलेले नाहीत. तथापि मराठी वास्तव जीवन पाहाणारा एकच एक कादंबरीकार म्हणून टिकेकरांचे महत्त्व विशेष वाटते.

" काळ तर मोठा कठीण आला" ही दीर्घकथा हरिभाऊंनी " करमणूक " मधून १८९७ मध्ये लिहली, या कथेत त्यांनी रामजी धायगुडे या शेतक-याच्या कुटुंबावर कोसळलेल्या आपत्तीचे व परिणामी विनाशाचे चित्र रेखाटले आहे. ग्रामीण जीवन चित्रणाचा पुरस्कार करणारे म्हणून सुरवातीच्या कलाकृतीत उपरोक्त साहित्य ठळक मानता येते. वि. सी. गुर्जर यांनी " दिपोटी " " भिकार कोकणात" अशा काही कथा लिहिल्या आहेत.

ग्रामीण जीवन चित्रण करणारे व नवे असे अनुभवविश्व भरघोसपणे सादर करणारे ना. वि. कुलकर्णी यांना " खेडूत सृष्टीचे कादंबरीकार" असे म्हटले तरी त्यांच्या कादंब-याचा योग्य परामर्श घेतला गेलेला नाही. कामगार जीवनाचा वेध घेणारी

त्यांची " मजूर " ही कादंबरी बरीच गाजली. " कसे दिवस जातील " ( १९२५) ही कादंबरी एका शेतकरी कुटुंबाची शोकात्मिका आहे. कर्जबाजारीपणामुळे शेतीवाडी सोडून मुंबईला गेलेला आबा. मुले व आपण स्वत: अपप्रवृत्तीला बळी पडतात. या विपरीत परिस्थितीत सा-या कुटुंबाला सावरणारी त्याची पत्नी रखमा. शेवटी ते आपल्या गांवी जातात व सुखी होतात हा कथापट एकंदरीत उत्तम जमला आहे.

( १९२५ ) -" शिपाई " ही त्यांची नंतरची कादंबरी असावी. " शिपाई " मध्ये कृष्णाकाका गरीब विधवा निराबाईची जमीन गिळंकृत करण्यासाठी तिच्या मुलीला ( मंजुळेला ) सून म्हणून घरात आणावे व आपल्या मार्गातला अडसळ ठरु पाहणारा मल्हारी याला जावई करुन घ्यावे असा डाव रचतात.

ग्रामीण साहित्याच्या जीवनचित्रणाचा जाणीवपूर्वक प्रयत्न ना. वि. कुलकर्णी, वि. स. सुखठणकर यांनी केला. " सह्याद्रीच्या पायथ्याश्शी" ( १९३१ ) या सुखठणकर यांच्या कथासंग्रहाने " प्रादेशिक साहित्याचे" दालन खुले झाले. ग्रामीण वास्तवचित्रणाचा आणखी एक नवा उन्मेष अवतरला. " प्रादेशिक " ही संज्ञा येथेच पहिल्यांदा सार्थपणे उपयोजिली गेली. सुखठणकरांनी या कथासंग्रहास " आठ,प्रादेशिक कथा" असे वर्णनात्मक उपशीर्षक दिले. या काळात लेखन करणा-या वा. म. जोशी, वि. स. खांडेकर आणि मामा वरेरकर यांच्या कादंबरीत कांही ठिकाणी ग्रामजीवनाचे चित्रण आहे. पण ते कृत्रिम आणि वास्तवशून्य असल्याने

मराठी ग्रामीण कादंबरीच्या विकासाच्या टप्प्यात त्याचा विचार निष्प्रभ ठरतो. ग्रामवादाच्या निमित्ताने ग्रामजीवनचित्रणाच्या निर्माण झालेल्या शक्यता तुजबी ठरल्या.

मात्र कोकणातले समाजजीवन व निसर्गाचे अगदी सहजस्वाभाविक असे चित्र " श्यामची आई " मध्ये साने गुरुजींनी रेखाटलेले आहे. या पुस्तकाबद्दल रवीन्द्र ठाकूर लिहितात, " हे पुस्तक म्हणजे सुटया-सुटया वाटणाऱ्या परंतु एकमेकांशी गुंफलेल्या कथांची मिळून बनलेली एक कादंबरीच आहे. कोकणातील पालगड, वडवली, लाडघर, दापोली, हर्णे ही गावे आणि त्याच्या आसपासचा ग्रामीण परिसर या कादंबरीतून साकार होतो. या कथेला कोकणी ग्रामजीवनाचे कोंदण लाभले आहे. त्या काळातल्या इतर कुठल्याही पुस्तकात ग्रामजीवनाचे एवढे अस्सल वर्णदर्शन घडत नाही"[२२] ठाकूरांनी " श्यामची आई " या पुस्तकास ग्रामीण साहित्य प्रवाहातील तत्कालीन कोकणी समाजजीवनाचा वाङ्‌मयीन दस्तऐवज संबोधला आहे. रविन्द्र ठाकूरांनी " श्यामची आई " या पुस्तकास कादंबरीचे मूल्य दिले आहे. साने गुरुजींनी प्रतिभेच्या सामर्थ्याने कोकण प्रदेशातील एक ठराविक पट्टी अगदी सहज शब्दबध्द केली आहे.

साने गुरुजींच्या कादंब-यांनी सर्व सामान्य कादंब-यातून बराच वेगळ्या स्वरुपाचा वाटणारा असा पृथगात्म प्रकृतीचा जसा एक स्वतंत्र प्रवाह निर्माण केला, त्याचप्रमाणे पुढे जाऊन ग्रामीण साहित्य प्रवाहामध्ये र. वा. दिघे यांनी ठळक असे स्थान निर्माण केले. तसेच वि.वा. हडपांनी ग्रामीण जीवनावर " झाकली मूठ" ( १९१७ ) , " गौरीशंकर " ( १९२८) या कादंब-यांचे लेखन केले. ग. रा. वाळिंबे, गजाभाऊ, ना. ह. आपटे आणि द. न. शिखरे या सर्वांनी आपल्या परीने खेडयातल्या ख-या महाराष्ट्राचे दर्शन घडविण्याचा आपल्या कादंब-यातून प्रयत्न केला.

र.वा. दिघे यांचे नांव विशेष गौरवाने उल्लेखिण्यासारखे आहे. " पाणकळा" ( १९३९), " सराई " ( १९४३), " पूर्तता" ( १९४४ ), " निसर्गकन्या रानजाई " ( १९४६ ) " गानलुब्धा मृगनयना", १९४७ ही त्यांची कादंबरीसृष्टी पण त्यापैकी त्यांच्या प्रतिभेच्या मोहक पदन्यासाची जिवंत प्रतीति आणून देणा-या " पाणकळा" व " सराई " या दोनच कृती, आनंद यादव यांनी त्यांना " मराठी मातीचा पहिला कादंबरीकार" असे संबोधले आहे. त्यांनी स्वतंत्र जाणीवेने ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे. त्यांची ही जाणीव त्यांच्या उद्गारातूनच स्पष्ट होते. ते लिहितात, " मराठी वाङ्.मयावर संस्कृत, इंग्रजी, बंगाली व फारशी वाङ्.मयाची छाप पडली आहे. आपल्या नविन वाङ्.मयात

बुलबुल गुलाबाचे फुलाजवळ गातात. प्रणियिनींच्या अंगावर लिलीची फुले उमलतात, किंवा मुखकमले, प्रफुल्ल होतात. आम्हाला तसे काही दाखवयाचे नाही. महाराष्ट्राचे खरेखुरे देखावे, त्यांतील ख-या व्यक्ती आम्हाला रेखाटावयाच्या आहेत. आमच्या खेडेगावातील, प्रणय हा असा आहे. हृदयात घुसला की हृदय फाडल्याशिवाय निघत नाही..."[२३] खरोखरच " पाणकळा" व " सराई " या कादंब-या लिहून दिघ्यांनी मराठींतील ललित शब्दसृष्टीत निसर्गरम्य उपवनें फुलविली आहेत. कोकणांतील शेतक-यांच्या जीवनाशी ते स्वत: समरस झाले असल्यामुळे उत्कट व परिणामकारक चित्रण केले आहे.

" पाणकळा" च्या कथानकाला लाभलेली पार्श्वभूमी वास्तव आहे. शेतक-यांचे निसर्गावलंबी जीवन, त्यांचे दारिद्र्य दुष्काळ, घराण्यांची पूर्वापार चालत आलेली वैमनस्ये, यातून घडलेला संघर्ष या चित्रणामुळे ग्रामजीवन साकार झाले आहे. ही वेधकता " रानजाई " " पड रे पाण्या!" ( १९५८) आई आहे शेतात" ( १९५६) या कादंब-यात मात्र पुष्कळच जास्त प्रमाणात विस्तारलेली आहे. कादंबरीतील जीवनचित्रणास सखोलता लाभली आहे. मानवी जीवनाविषयींच्या व्यापक व सखोल सहानुभूतीमुळे, प्रादेशिकतेच्या मर्यादांना न जुमानणारे सामर्थ्य त्यांच्या कादंब-यांना लाभले आहे. थोडक्यात, मराठी कादंबरी वाङ्मयात " पाणकळा"ने ग्रामीण कादंबरीचा प्रवाह निर्माण केला, हे मान्यच करावे लागते.

" गावगुंड " आणि " पाणकळा" या कादंब-यात विलक्षण साम्य आहे. ग. ल. ठोकळ यांची १९४६ ची " गावगुंड" ही कादंबरी थोडी रांगडी, थोडी पांढरपेशी आहे. " पाण-कळाचे" दोष टाळून अतिशय आटोपशीर बांध्याची ही कादंबरी ग. ल, ठोकळ यांनी घडविली आहे. १९४० नंतर ग्रामीण साहित्यनिर्मितीस विशेष भरते आले. प्रगल्भ सामाजिक जाणीवे-तून झालेल्या माटे यांच्या कथालेखनामुळे दलितांचे व वन्य जमातींचे जीवन शब्दांकित झाले. याच काळात वामन चोरघडे यांची ग्रामीण कथा घडू लागली होती.

१९५० च्या आसपास मराठी कादंबरीत नवचैतन्य व नवी जाणीव दिसू लागली. " बळी" ( १९५० ) मध्ये विभावरी शिरुरकर यांनी नवीन जाणीव निर्माण केली. विभावरींच्या मनात निर्माण झालेल्या या समाजविषयीच्या अपार जिव्हाळ्यातून " बळी " चे लेखन झाले आहे. गुन्हेगार म्हणून घोषित झालेल्या मांग गारुडी समाजाचे जीवनचित्रण केले आहे. गुन्हेगारी वृत्ती का निर्माण होते याचा शोध घेण्याचा प्रयत्न विभावरींनी केला आहे.

विभावरी शिरुरकराच्या नंतर मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात ठळकपणे पुढे येणारे नाव म्हणजे श्री.ना. पेंडसे यांच्या " एल्गार" ( १९४९), " हद्दपार" ( १९५० ) " गारंबीचाबापू " ( १९५२), " हत्या" ( १९५४), " कलंदर" ( १९५९), व " रथचक्र " ( १९६२ ) या कादंबरीवाङ्मयातून आलेल्या अनुभवविश्व प्राधान्याने ग्रामीण व प्रादेशिक होते.

" एल्गार " ही कोकणातल्या सासरपेंडी या खेडयात घडणारी रघू आणि कादर या दोन सुशील जिवांची प्रेमकथा आहे. " गारंबीचाबापू " ही पेंडशांची तिसरी कादंबरी जगावेगळ्या अफाट बापूची जीवनकथा यशस्वीपणे रेखाटली आहे. बापूच्या कर्तत्वाचे चित्रण लोकप्रिय ठरले. परंतु पेंडशांना संपूर्ण ग्रामीण परिसर साकार करता आला नाही. " रथचक्र" मधील जीवनचित्रणाची व्याप्ती कौटुंबिकतेच्या पलीकडे जात नाही. कोकण प्रदेशांतील एक ठराविक पट्टी ही पेंडशांच्या उपयुक्त कादंब-यांतील कथावस्तूंना व तदंतर्गत पात्रांना साकार करणारी रंगभूमी आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांची " पुढच पाऊल " ( १९५७ ) ही पहिली कादंबरी दलित कलावंताची कथा वर्णन करते. " किसना" " मोगरीबाई " नावाच्या बाईच्या नादात लागतो. व त्याच्या कुटुंबियाची दुर्दशा होते. अशा अवघड स्थितीत किसना स्वत:ला सावरतो आणि तमाशा क्षेत्रात पाय रोवून उभा राहतो. असे कथानक माडगूळकरांनी रंगवले आहे. त्यांच्या त्यांच्या १९५५ सालच्या " बनगरवाडी " एवढी वेगळी होती की, तिची परंपरा दाखवून देणे अवघड व्हावे. निसर्गाच्या परिसरात जीवन जगणा-या मानवसमूहाचे दर्शन " बनगरवाडी"मुळे घडले. " माणदेश" ठळकपणे चित्रित करण्यात माडगूळकरांना यश आले. " बनगरवाडी"चा विचार जुन्या मूल्यांनी करता येत नव्हता.

कारण तेथे नायक-नायिका, खलनायक, कथानक असा प्रकारच नव्हता, बनगरवाडीच्या धनगरांचे समूहजीवनच चित्रण विषय म्हणून केंद्रस्थानी होता. त्यालाच नायकत्व लाभलेले होते. थोडक्यात एकंदर व्यंकटेश माडगूळकरांनी प्रादेशिक कादंबरीचा नवा मानदंड निर्माण केला. सर्व व्यक्तिरेखा हाडामासाच्या आणि माणदेशाच्या मातीतल्या वाटतात. १९५० ते १९६० हा काळ पेंडसे, दांडेकर-माडगूळकर यांच्या कादंबरीचा आहे.

गो. नी. दांडेकरांच्या कादंबरी लेखनांत एक प्रकारची उत्क्रांती झालेली आढळते. शालेय जगतासाठी लिहिलेल्या बोध-परायण कथांपासून तो " शितू " सारख्या चिरमधुर प्रेम कथे-पर्यंतचा त्याच्या कथानिर्मितीचा झालेला विकास खरोखर विलोभनीय आहे. " शितू " मध्ये रसरशीत प्रादेशिकतेचे दर्शन घडविले आहे. शितूच्या विसूवरील प्रेमाची ही दिव्य गाथा प्रादेशिक पार्श्वभूमीवर चित्रिलेली आहे. प्राचीन काळापासून चालत आलेली समाजव्यवस्था उद्‌ध्वस्त होत चाललेली आहे हे पाहून गोपीदा व्यथित होतात. यातूनच " पडघवली " ( १९५५ ) सारखी कादंबरी लिहली जाते. वेगवेगळ्या अनुभवक्षेत्रांचा शोध आणि त्यांचे प्रभावी सादरीकरण हे प्रादेशिक ग्रामीण वाङ्‌मयाचे वैशिष्ट्य आहे.

१९५०ते १९६० या काळात पेंडसे-दांडेकर-माडगूळकर यांच्या ग्रामीण कादंबरीचे एकूणच मराठी कादंबरीच्या संदर्भात महत्वाची भर पडली. याच काळात ग्रामीण कादंबरीला प्रादेशिकतेचा स्पर्श

लाभला. जीवनाकडे ती अधिक वेगाने, गांभीर्याने पाहू लागली. सुमारे १९४७ ते १९५० मधील " एल्गार", " कळी " " बनगरवाडी" " गावगूंड" " पडघवली" व " हद्दपार" या कादंबऱ्यांनी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात स्वतंत्र आणि वैशिष्टपूर्ण स्थान प्राप्त केले. या कलाकृतीचा गौरवपूर्वक उल्लेख करावा लागतो. १९६० पर्यंत नागरजीवनाचे चित्रण करणारी ग्रामीण कादंबरी १९६० नंतर जीवनानुभव आविष्कृत करणारी संपन्न व्यापक मानवतावादी बनली.

अशाप्रकारे आपण १८८० ते १९६० पर्यंतचा मराठी ग्रामीण कादंबरीचा विचार केला.

समारोप :-

१." कादंबरी एक वाङ्.मयप्रकार" अभ्यासतांना कादंबरीची संकल्पना , व्याख्या विषयक प्रश्न इ. चर्चा केली. प्रस्तुत प्रकरणा-मध्ये कादंबरीची संकल्पना तसेच कादंबरीचा स्वरूप विचार मांडण्याचा प्रयत्न केला. १८५७ पासूनचा मराठी कादंबरीची वाटचालीच्या पाऊलखुणा अभ्यासल्या. ग्रामीण कादंबरी आणि प्रादेशिक कादंबरी मधील भेद अभ्यासला. अलिकडे मराठी ग्रामीण कादंबरी मध्ये हा प्रश्न अभ्यासकांना भेडसावत आहे. म्हणूनच या प्रश्नासंबंधीच्या मतमतांतरांचा आढावा घेवूनच ग्रामीण कादंबरीच्या पूर्वपीठिकेकडे वळलो.

२. " धग " पूर्व ग्रामीण कादंबरीची पूर्वपीठिकेमध्ये धनुर्धारी, फुले, भालेराव, ना. वि. कुलकर्णी, वि. स.सुखटणाकर, साने गुरुजी, र.वा. दिघे, ठोकळ, विभावरी शिरुरकर, पेंडसे, दांडेकर, माडगूळकर

यांच्या १९०३ ते १९६० पर्यन्तच्या ग्रामीण कादंब-याचा आढावा घेतला.

३. " धग " पूर्व ग्रामीण कादंब-यांचा गुणदोष चिकित्साही केली. व्येंकटेश माडगूळकर यांच्या " बनगरवाडी " ने प्रादेशिक कादंबरीचा नवा मानदंड निर्माण केला. मराठी कादंबरी आता मध्यमवर्गीयांच्या मर्यादित जीवनकक्षेच्या बाहेर पडू पाहात आहे,हे पाहिले.

४. उदधव शेळके यांच्या " धग " ( १९६० ) या कादंबरोमुळ मराठी ग्रामीण कादंबरीत मोलाची भर पडली. किंबहुंना मराठी ग्रामीण कादंबरीने " धग " मुळे प्रवासाची दिशा बदलली. तिचा प्रवास वास्तववादी भूमिकेतून होऊ लागला. शेळकेंनी प्रचलित रचनातंत्र झुगारून ग्रामीण वास्तवाचा स्पर्श समर्थ अविष्कार घडविला. " धग " ने कादंबरी रचनेचे रूढ संकेत झुगारून जीवनानुभवाची मांडणी वास्तवपणे स्विकारली, ही साहित्यकृती ग्रामीण कादंबरीत मैलाचा दगड ठरली. आता पुढील प्रकरणात " धग " या कादंबरीत चित्रित झालेले समाजजीवन" कोणत्या स्वरुपाचे आहे याचा आता अभ्यास करु.

## प्रकरण पहिले

## संदर्भ -सूची


१. स्पिअरमन डायना : द नॉव्हेल ॲण्ड सोसायटी, रोलेज ॲण्ड केगन पॉल लंडन १९६६. पृ. क्र. ३७७

२. मराठे, का. बा कादंबरी ग्रंथमाला प्रकाशन मुंबई १९७२, पृ. क्र. १३३

(३) हस्तक उषा : साहित्य: अध्यापन आणि प्रकार ( वा. ल. कुलकर्णी : गौरव ग्रंथ) मौज प्रकाशनगृह, मुंबई, आवृत्ती पहिली. १९८७. पृ. क्र. २५५

४. जाधव, रा.ग. : मराठी विश्वकोश खंड -३ ( संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी ), म.रा. सा. सं. मंडळ, मुंबई. आवृत्ती पहिली. पृ.क्र. ६००

(५) देशपांडे कुसुमावती : मराठी कादंबरी/ पहिले शतक मुंबई, मराठी साहित्य संघ, आवृत्ती दुसरी.१९७५, पृ. क्र. १६

६. प्रिस्टले जे. बी. : केतकरी कादंबरी ( दुर्गा भागवत) मौज प्रकाशनगृह, मुंबई, आवृत्ती पहिली १९६७, पृ. क्र. ७.

७. तत्रैव, पृ. १२

८. तत्रैव, पृ. १३

९. तत्रैव, पृ. १४

१०. नेमाडे, भालचंद्र = टीका स्वयंवर, साकेत प्रकाशन औरंगाबाद
आवृत्ती पहिली, १९९०, पृ. क्र. १९९८.

११. बापट, प्र. वा आणि गोडबोले : ना. वा. मराठी कादंबरी: तंत्र आणि विकास,
व्हीनस प्रकाशन, पुणे. आवृत्ती तिसरी. १९७३. पृ. क्र. ३३

१२. हस्तक, उषा : साहित्य : अध्ययन आणि प्रकार
( वा. ल. कुलकर्णी गौरव ग्रंथ )
मौजप्रकाशनगृह, मुंबई, आवृत्ती पहिली.
१९८७पृ. क्र. २५३.

१३. गाडगीळ गंगाधर : साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन,
मुंबई, आवृत्ती पहिली, पृ.क्र. २०७

१४. दिघे, र. वा : पाणकळा, श्री लेखन वाचन भांडार, पुणे
आवृत्ती पाचवी, १९७५, पृ.क्र. ८५

१५. दिघे, र. वा. : साहित्यिक गप्पा/ दहा साहित्यिकांशी
( जयवंत दळवी ) सन पब्लिकेशन्स
पुणे. आवृत्ती पहिली. १९८५. पृ.क्र.
७५.

१६. यादव, आनंद : ग्रामीण साहित्य: स्वरूप व समस्या,
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
आवृत्ती पहिली, पृ. क्र. ६२,६३

१७. तत्रैव प. क्र. ६६/६७

१८. फडके, ना. सी : प्रतिभा विलास, विश्वकर्मा साहित्यालय आवृत्ती पहिली १९६६ पृ., क्र १९९

१९. कुलकर्णी मधु : महाराष्ट्र साहित्य पत्रिका ( ग्रामीण साहित्य विशेषांक) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. जुलै, डिसें. १९८०. पृ.क्र. ४५

२०. कोत्तापल्ले. नागनाथ : ग्रामीण साहित्य:स्वरूप आणि शोध पब्लिशिंग हाऊस पुणे. आवृत्ती पहिली १९८५, पृ.क्र. १५

२१. मालशे, स.ग. : ( मराठी ग्रामीण कादंबरी: रवींद्र ठाकूर ), मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे. आवृत्ती पहिली १९९३. पृ. क्र. ३०. ३१. वरून उद्धृत

२२. ठाकूर र. ना. : मराठी ग्रामीण कादंबरी, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे. आ.प. १९९३, उ.नि. पृ. कृ. ४४

२३. बापट प्र.वा. गोडबोले. : मराठी कादंबरी: तंत्र आणि विकास व्हीनस प्रकाशन, पुणे. आवृत्ती तिसरी १९७३. पृ. क्र. ३६४